(**इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद**)

**[१९९६] ३ एस. सी. आर. ७६९**

**पश्चिम बंगाल राज्य आणि इतर**
- विरुद्ध –
**ट्रॉपिकल स्कूल एम्प्लॉयीज युनियन आणि इतर**

**२१ मार्च, १९९६**

**[ के. रामास्वामी आणि जी. टी.नानावटी, न्या. न्या.]**

सेवा विषयक कायदा :

वेतनाच्या तुल्यतेसाठी हक्कमागणी - कारमाइकल इन्स्टिटूट फॉर ट्रॉपिकल डिसीजेस - शासनाने हाती घेतली - संस्थेच्या कर्मचारी वर्गाचा स्वतंत्र संवर्ग घटीत - अराजपत्रित शिक्षक वर्गाला विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय घेऊन, दुसऱ्या वेतन आयोगाने केलेली शिफारस शासनाने अंशतः स्वीकारली - गट- 'क' आणि 'ड' मध्ये मोडणारे इतर कर्मचारी वर्ग, म्हणजे, अवैद्यकीय तांत्रिक कर्मचारी वर्ग आणि वर्ग- चार चे कर्मचारी वर्ग, यांना सरकारी कर्मचारी प्रमाणे वेतनश्रेणी सममूल्याने देणे चालू ठेवले - गट- 'क' आणि 'ड' च्या कर्मचारी वर्गाद्वारा विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या वेतनश्रेणीसाठी हक्कमागणी - रिट याचिका दाखल - उच्च न्यायालयाद्वारा हक्कमागणी मंजूर - राज्य शासनाद्वारा अपील - शिक्षकेतर वैद्यकीय कर्मचारी वर्ग तसेच वर्ग- ४ चे शासकीय कर्मचारी यांना सुद्धा विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या वेतनश्रेणीचा लाभ देण्यात उच्च न्यायालय संपूर्णतः असमर्थनीय होते, असा निर्णय.

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्रं. ५३८३/१९९६

एफ. एम. ए. क्रं. २११/१९९१ मध्ये कलकत्ता उच्च न्यायालय यांनी दिलेले न्यायनिर्णय व आदेश, दिनांक २७.८.९३ यातून उद्भवलेले.

अपीलकर्त्यांसाठी : तपस रे, ए. भट्टाचार्जी आणि बी. आर. तालुकदार.

उत्तरवादींसाठी : एम. एन. कृष्णमणी, अभिजीत सेन गुप्ता, जे. पी. सिंग, बी. एस. जैन आणि श्रीमती. व्ही. डी. खन्ना.

न्यायालयाचा पुढील आदेश देण्यात आला :

अनुमती देण्यात आली. आम्ही दोन्ही बाजूंच्या विद्वान काउन्सेल यांचे म्हणणे ऐकले आहे.

विशेष अनुमतीद्वारे हे अपील, सी . आर. क्रं. १६४८४/८४ मध्ये दिनांक २० जानेवारी १९८७ रोजी विद्वान एकल न्यायाधीश यांनी पारित केलेला आदेश कायम करून एफ. एम. ए. क्रं. २१११/९१ मध्ये कलकत्ता उच्च न्यायालयाच्या खंड न्यायाधीश मंडळाने दिलेल्या दिनांक २७ ऑगस्ट १९९३ रोजीच्या आदेशातून उद्भवलेले आहे. कबूल केलेली तथ्ये अशी आहेत की एक वेळ असा होता की कारमाइकल इन्स्टिटूट फॉर ट्रॉपिकल डिसीजेस हे धर्मादाय संस्थेद्वारे संचालित केले जात होते. त्यानंतर, १९४९ मध्ये, शासनाने तयार केलेल्या योजनेखाली ते काही काळ खाजगी संस्था म्हणून चालविण्यात आले. नंतर, दिनांक ४ मार्च १९७१ रोजी, शासनाने ती संस्था, १ एप्रिल, १९७१ पासून, आपल्या हाती घेतली होती. संस्थेच्या कर्मचाऱ्याच्या सेवेच्या शर्तींना सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्तीप्रमाणे मानण्यात आले होते. दिनांक १५ फेब्रुवारी, १९७३ रोजी शासनाने संस्थेत कार्यरत असलेल्या कर्मचारी वर्गाचा स्वतंत्र संवर्ग घटित केला. या अपीलात, आमचा संबंध अवैद्यकीय तांत्रिक कर्मचारी वर्ग आणि वर्ग - चार चे कर्मचारी वर्ग, या दोन संवर्गाशी आहे. शासनाने संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी संबधीत प्रकरण दुसऱ्या वेतन आयोगाकडे पाठवले होते. १९८१ मध्ये, दुसऱ्या वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीच्या अनुसार, जी अंशतः स्वीकारण्यात आली होती, शासनाने अराजपत्रित शिक्षक वर्गाला विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेणी देण्याचा आणि इतर कर्मचारी वर्गाला पूर्वीप्रमाणेच सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीशी सममूल्य वेतनश्रेणी देणे चालू

ठेवण्याचा निर्णय घेतला. असे दिसते की इतर कर्मचारी वर्गाने शासनाकडे अभिवेदन केले. शासनाने त्या अभिवेदनाचा काळजीपूर्वक विचार केला आणि त्यांनी दिनांक ९ जुलै, १९८४ रोजी, राज्यातील सात विद्यापीठांचे कर्मचारी ज्या विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या वेतनश्रेणीचा लाभ घेत आहेत ती वेतनश्रेणी संस्थेच्या गट- 'क' आणि गट - 'ड' कर्मचाऱ्यांना देता येणार नाही असा निर्णय घेतला. त्यानंतर, उत्तरवादींनी रिट याचिका दाखल केली. अभिलेखातून हे उघडकीस येते कि शासनाने विद्वान एकल न्यायाधीशांसमोर त्यास प्रतिवाद केला नव्हता, त्यामुळे, विद्वान एकल न्यायाधीशांनी रिट याचिका मंजूर केली आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या वेतनश्रेणी उत्तरवादींना देण्याचे निर्देश दिले. अपील दाखल झाल्यावर, तो आदेश कायम करण्यात आला. अशा तऱ्हेने विशेष अनुमतीद्वारे हे अपील.

हे निर्विवाद आहे कि शासनाने उत्तरवादींना सरकारी कर्मचारी म्हणून मानले होते आणि वेतन आयोगाने अवैद्यकीय तांत्रिक कर्मचारी वर्ग आणि वर्ग - चार चे कर्मचारी वर्ग यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या वेतनश्रेणी देण्याचे नाकारले. हि कबुल केलेली स्थिती आहे की सरकारी कर्मचारी हा राज्याच्या कर्मचाऱ्यांसाठी विहित केलेल्या वेतनश्रेणी स्वीकारण्यास बांधील असतो. वस्तुस्थिती अशी आहे कि मागितलेल्या विकल्पाच्या अनुसार, उत्तरवादींनी सरकारी कर्मचारी होण्याचा पर्याय स्वीकारला होता. दिनांक १६ फेब्रुवारी, १९७३ रोजीच्या शासनाच्या निर्णयात, खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले होते :

> परिशिष्ट - एक, परिशिष्ट- दोन मध्ये दर्शविल्याप्रमाणे अवैद्यकीय तांत्रिक कर्मचारी वर्ग आणि वर्ग- चार चे कर्मचारी वर्ग यांच्या पदांचा आरोग्य सेवा संचालनालयामध्ये मंजूर केलेल्या त्याच सारख्या संवर्गांना सेवाप्रवेश, पदोन्नती, इत्यादींच्या बाबतीत लागू असल्याप्रमाणे त्याच तत्त्वांवर स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन, कलकत्ता आणि तिच्याशी संलग्न संस्था यासाठी

स्वतंत्र संवर्ग घटित होईल आणि संचालक, स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन, कलकत्ता हे सुद्धा वेळोवेळी दोन्ही संवर्गाचे संख्याबळ संबद्ध शासन आदेशात विहित केलेल्या तत्त्वानुसार निश्चित करतील.

अशा प्रकारे हे स्पष्ट होईल कि उत्तरवादीं हे 'क' आणि 'ड' या दोन संवर्गाचे आहेत आणि सरकारी कर्मचारी बनले असल्यामुळे, ते 'क' आणि 'ड' संवर्गातील पदांसाठी शासनाने विहित केलेल्या वेतनश्रेणीनुसार वेतन आहरण करण्यास हक्कदार आहेत. प्रश्न असा आहे की ते विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या वेतनश्रेणी मिळण्यासाठी हक्कदार आहेत किंवा कसे.

श्री. एम. एन. कृष्णमणी, उत्तरवादीच्या वतीने विद्वान वरिष्ठ काउन्सेल यांनी समाधान व्यक्त केले कि शिक्षक वर्गांना विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या वेतनश्रेणी मिळत आहेत आणि उत्तरवादी हे शिक्षक वर्गांना मदत करत आहेत; जेव्हा विद्यापीठांमध्ये काम करणाऱ्या अशाच व्यक्तींना विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या वेतनश्रेणी मिळत आहे, तेव्हा उत्तरवादी सुद्धा त्या वेतनश्रेणी मिळण्यास तितकेच हक्कदार आहेत. आम्ही त्यांनी घेतलेल्या भूमिकेला दाद देऊ शकत नाही. विद्यापीठांचे कर्मचारी हे शासकीय कर्मचारी नाहीत. त्यांचे आपापल्या अधिनियमितीखालील त्यांच्या विनियमनद्वारे आणि संविधिद्वारे नियमन केले जाते. उत्तरवादीना, त्यांच्या स्वतःच्या कबूल केलेल्या स्थितीवरून शासकीय कर्मचारी असल्यामुळे, पदासाठी त्यावेळी विहित केलेली उच्च वेतन श्रेणी मिळू शकत नाही. अशा परिस्थितीत, शिक्षकेतर वैद्यकीय कर्मचारी वर्गाला तसेच वर्ग- चार च्या सरकारी कर्मचाऱ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या वेतनश्रेणीचा लाभ देण्यामध्ये उच्च न्यायालय संपूर्णतः असमर्थनीय होते.

तदनुसार, अपील अनुमत करण्यात येते. अपीलातील उच्च न्यायालयाचे तसेच विद्वान एकल न्यायाधीशाचे आदेश रद्द करण्यात येतात. परिणामी, रिट याचिका खारीज करण्यात येते. वाद खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

अपील अनुमत.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरीता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.